# खाद्यपदार्थांतून संस्कृतीची ओळख

## डॉ. शां. ब. मुजूमदार यांचे प्रतिपादन

**पुणे :** विविध देशांना भेटी देताना त्या त्या भागांतील वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांचा आस्वाद मनापासून घेतला पाहिजे. त्यामुळे आपोआपच संस्कृतीची ओळख होत राहते, असे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी व्यक्त केले. बुकगंगा पब्लिकेशन्सतर्फे अनिल नेने लिखित 'खावे त्याच्या देशा' आणि 'मनोगत' या पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्तीचे आणि ई - आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. वीणा देव, लेखक अनिल नेने, डॉ. आश्विनी नेने,विजय देव, बुकगंगाचे संस्थापक मंदार जोगळेकर उपस्थित होते. नेने यांची नातवंडे लारा व थियो डॉड यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.



- नेने यांनी विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना आपल्यातील कवी मनाला जागा करून दिली. त्याचे रूपांतर, प्रतिबिंब मनोगत पुस्तकात उमटले आहे . त्यांच्या कविता या भावनाप्रधान आणि संवेदनशील आहेत, असे ते म्हणाले .

- डॉ. देव यांनी नेने यांच्याबाबतच्या आठवणी सांगितल्या. नेने यांनी पाकसिद्धीतील बारकावे शोधले, नवीन पदार्थाची चव अनुभवली. त्यांच्या लेखनात अभ्यासू वृत्ती जाणवते. हा त्यांचा खाद्यानुभव लेखनातून वाचकापर्यंत पोचवला आहे.

- नेने यांना सूत्रसंचालिका ममता क्षेमकल्याणी यांनी मुलाखतीच्या माध्यमातून बोलके केले.